| CNR NO.MHLA090026092018 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | १७.१०.२०१८ |
| | नोंदणी तारीख | : | १७.१०.२०१८ |
| | निकाल तारीख | : | ०९.०७.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | | **०७ ०८ २२** |

**भाग – अ**

| |
|---|
| **२ रे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग उदगीर यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती.एस.जे.शिंदे)**<br>**न्यायनिर्णय**<br>**निकाल दिनांक ०९/०७/२०२६**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.२६०/२०१८**<br>**निशाणी क्र.१०३** |

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर बाबत सविस्तर माहिती, गुन्हा आणि पोलीस ठाणे,** | | भारतीय दंड संहितेचे कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ अन्वये.<br>पोलीस ठाणेः उदगीर ग्रामीण |
| **तक्रारदार/अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण |
| **अभियोगपक्षा करीता** | | श्रीमती अस्मिता चव्हाण |
| **आरोपी** | | १. भगीरथ ज्ञानोबा ढेकणे<br>वय ३८ वर्षे, धंदा नोकरी<br>रा.रिलायन्स पेटोल पंपाच्या मागे,<br>एल.आय.सी.कॉलनी, औसा रोड,<br>लातूर |

| | | |
|---|---|---|
| | | २. बीरांची नारायण मिश्रा,<br>वयः– ४६ वर्षे, व्यवसायः– नोकरी,<br>रा.कलिंगा विहार, भुवनेश्वर, ओडीसा<br>३. अनुप अजयकुमार शाह<br>वयः– ४५ वर्षे, व्यवसायः– नोकरी,<br>रा.सुप्रिम पाम्स, बलदेवी, पुणे<br>४. बळवंत सिताराम बगल<br>**(मयत/खटला अपशमित झाला)** |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | श्रीमती एस.एम.लोया |

## न्यायनिर्णय

**(खुल्या न्यायालयात घोषीत)**

**(निकाल दिनांक ०९ जुलै २०२६)**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरूध्द त्यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ अन्वये दंडनिय अपराधाकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

०२. फिर्यादी अनिता ब्रम्हाजी केंद्रे यांनी दिनांक १४.११.२०१७ पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण येथे हजर होवुन जबाब दिला की, १५.०२.२०१६ ते १४.११.२०१७ पावेतो नेटाफीम ॲग्रीकल्चर फायनानसिंग एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड मुंबई शाखा कव्वा रोड मार्केट यार्ड लातूर येथील मॅनेजर भगीरथ ज्ञानोबा ढेकणे, क्रेडीट हेड बीरांची मिश्रा, अकांउटंट अनुप अजयकुमार शहा व वसुली अधिकारी बळवंत सीताराम बागल यांनी एकमेकास सहाय करुन विश्वासात घेवुन १४ लाख कर्ज मंजुर केल्याचे कागदोपत्री दाखवले व केवळ ०९ लाख रुपये फिर्यादीस देवुन उर्वरीत कर्जाची रक्कम ०५ लाख हडप करण्याच्या उद्येशाने त्याना

देण्यास टाळाटाळ केली व रक्कम दिलीच नाही त्यामुळे त्यांच्या प्रोजेक्टचे काम पुर्ण न झाल्याने त्यांचे ३० ते ३५ लाखाचे केले व त्यांचा विश्वासात करून फसवणुक केली.

०३. उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यातील पोलीसांना याची माहिति मिळाल्यानंतर पोलीसांनी फिर्यादीचा जबाब नोंदविला. त्या जबाबाअधारे उदगीर (ग्रामीण) पोलीस ठाणे अपराध क्र. ४३१/२०१७ हा भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयाकरिता गुन्हा नोंद केला.

०४. सदर कामी उपविभागीय पोलीस निरीक्षक अनिल चोरमले यांनी तपास केला. त्यांनी तपासा दरम्यान संबंधित कागदपत्रे हस्तगत केली, वर्दीदार व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्याने आरोपींना तांत्रिकरित्या अटक केली व तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०५. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ अन्वये खालील शिक्षापात्र कलमांतर्गत नि.क्र.८५ नुसार आरोप ठेवले जो त्यांना त्यांच्या मातृभाषेत वाचून दाखविण्यात व समजावून सांगण्यात आले असता वरील आरोपींनी गुन्हा नाकबूल करुन प्रकरणाची संपरिक्षा करण्याची मागणी केली. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविणे संपल्यावर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे वरील आरोपी क्र.१ ते ३ यांचा जबाब निशाणी १०१ प्रमाणे नोंदविण्यात आले. बचावाच्या पुष्टयर्थ त्यांनी बचावाचे साक्षीदार तपासले नाही.

०६. मी सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. न्यायालयासमोर आलेल्या मौखीक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये त्याचा उल्लेख आवश्यकतेनुसार केला आहे.

०७. दोषारोपपत्र निश्चित केलेले दोषारोप व आलेला पुरावा या अनुषंगाने माझ्या समोर खालील नमुद प्रश्न उपस्थित झाले असून त्याबाबतचे कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | दिनांक १५–२–२०१६ ते १४–११–२०१७ या कालावधीमध्ये आरोपी क्र.१ ते ३ मयत बळवंत यांनी आपसात संगनमत करून आपल्या सामायिक उद्देशाच्या पूर्ततेसाठी 'नेटाफिम ॲग्रीकल्चर फायनान्सिंग एजन्सी प्रा. लि.' (मुंबई शाखा: कावा रोड, मार्केट यार्ड, लातूर) चे कर्मचारी असताना अनुदानाची रक्कम अप्रामाणिकपणे स्वतःच्या फायद्यासाठी वापरून विश्वास भंग केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| २. | उपरोक्त कालावधी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ मयत बळवंत यांनी आपसात संगनमत करून आपल्या सामायिक उद्देशाच्या पूर्ततेसाठी लोकसेवक असताना, अनुदानाची रक्कम अप्रामाणिकपणे स्वतःच्या फायद्यासाठी वापरून विश्वासाचा भंग केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त कालावधी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ मयत बळवंत यांनी आपसात संगनमत करून आपल्या सामायिक उद्देशाच्या पूर्ततेसाठी 'नेटाफिम ॲग्रीकल्चर फायनान्सिंग एजन्सी प्रा. लि.' (मुंबई शाखा, कावा रोड, मार्केट यार्ड, लातूर) चे कर्मचारी या नात्याने फिर्यादी आणि साक्षीदारांची फसवणूक केली किंवा त्यांना अप्रामाणिकपणे वागवून सरकारी अनुदानापासून वंचित ठेवले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ४. | उपरोक्त कालावधी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ मयत बळवंत यांनी आपसात संगनमत करून आपल्या सामायिक उद्देशाच्या पूर्ततेसाठी नेटाफिम ॲग्रीकल्चर फायनान्सिंग एजन्सी प्रा. लि.' (मुंबई शाखा, कावा रोड, मार्केट यार्ड, | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | लातूर) येथील कर्मचारी असताना, फिर्यादी व साक्षीदार यांचे नुकसान करण्याच्या /फसवण्याच्या उद्देशाने काही कागदपत्रे बनावटरित्या तयार केली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | |
| ५. | काय आदेश ? | आरोपींना निंदोषमुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

०८. या कामी अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ वर्दिदार अनिता ब्रम्हाजी केंद्रे (नि.क्र. १०५) व साक्षीदार क्र.२ ब्रम्हाजी माधवराव केंद्रे (नि.क्र.१०८) यांना तपासले. तसेच फिर्यादीने पुराव बंद केल्याची पुरसिस निशाणी ११० वर हजर केली आहे. याउलट आरोपींनी कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अलेखावर दाखल केलेला नाही.

### प्रश्न क्र.१ ते ४ करीताः–

०९. सदर प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेंचन एकत्र केले आहे.

१०. अभियोग पक्षाने आरोपीवरील अपराध शाबीत करण्यासाठी वर्दिदार साक्षीदार क्र.१ अनिता ब्रम्हाजी केंद्रे यांची साक्ष निशार्णी क्र.१०५ वर नोंदवली आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१७ मध्ये त्यांनी आरोपीं विरुध्द फसवणुकीची केस केली होती व त्या घटनेला १० वर्षे

झाली असल्याने त्याबाबत काहीही आठवत नाही. त्यांनी आरोपीच्या विरुध्द रागाच्या भरात फिर्याद दिली होती. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांच्या विनंतीवरून सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची अनुमती अभियोग पक्षास देण्यात आली. त्याप्रमार्णे तपशीलवारपणे विचारणा करण्यात आली. परंतु अभियोग पक्षास उपयक्तु अशी साक्ष त्यांच्या तोंडून वदवून घेण्यास अयोग पक्षास अपयश आले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलांनी उलटतपास घेतलेला नाही.

११. अभियोग पक्षाने आरोपींवरील अपराध शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्र.२ ब्रम्हाजी माधवराव केंद्रे यांची साक्ष निशाणी क्र.१०८ वर नोंदवली आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१७ मध्ये त्यांच्या पत्नीने आरोपीं विरुध्द फसवणुकीची केस केली होती व पोलीसांनी त्यांचे टिपण नोंदवले होते. परंतु सदर घटनेला १० वर्षे झाली असल्याने त्यांना त्याबाबत काही आठवत नाही. सदर साक्षीदार अयोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांच्या विनंतीवरून सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची अनुमती अभियोग पक्षास देण्यात आली. त्याप्रमाणे तपशीलवारपणे विचारणा करण्यात आली. परंतु अभियोग पक्षास उपयुक्त अशी साक्ष त्यांच्या तोंडून वदवून घेण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलांनी उलटतपास घेतलेला नाही.

१२. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी वरील दोन साक्षीदार वगळता दुस-या साक्षीदाराचीसाक्ष नोंदवली नाही. तपासिक अंमलदार, पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. तसेच कागदोपत्री पुरावा शाबीत करण्यात आला नाही. अभियोग पक्षास आरोपीरूद्ध ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे शाबीत करण्यास पूर्णपणे अपयश आले आहे.

वरील बाबींचे अवलोकन केले असता आरोपींनी कथित गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे शाबीत केले नाही. आरोपींच्या विधिज्ञाच्या यक्तीवादानुसार त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली आहे. सदर फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान असलेला वाद मिटलेला आहे. सद्यस्थितीत फिर्यादी व आरोपीमध्ये कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

१३. प्रस्तुत केसमध्ये संयुक्त तडजोड पुरशीस दाखल करण्यात आली आहे. वरील बाबींचा विचार करता आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे संशयापलीकडे शाबीत होत नाही. सबब, प्रश्न क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**प्रश्न क्र. ५ करीताः–**

१४. प्रश्न क्र.१ ते ४ बाबतचे माझे निष्कर्ष पाहता अभियोग पक्षाला आरोपींविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. परिणामतः आरोपींना र्निदोष मुक्त करणे योग्य होणार आहे. तसेच, आरोपी कडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीकडून प्रत्येकी रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता न एकत्र केले आहे.

१०. अभियोग पक्षाने आरोपीवरील अपराध शाबीत करण्यासाठी वर्दिदार साक्षीदार क्र.१ अनिता ब्रम्हाजी केंद्रे यांची साक्ष निशाणी क्र.१०५ वर नोंदवली आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१७ मध्ये त्यांनी आरोपीं विरुध्द फसवणुकीची केस केली होती व त्या घटनेला १० वर्षे झाली असल्याने त्याबाबत काहीही आठवत नाही. त्यांनी आरोपीच्या विरुध्द रागाच्या भरात फिर्याद दिली होती. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य

करीत नसल्याने सरकारी वकिलांच्या विनंतीवरून सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची अनुमती अभियोग पक्षास देण्यात आली. त्याप्रमार्णे तपशीलवारपणे विचारणा करण्यात आली. परंतु अभियोग पक्षास उपयक्तु अशी साक्ष त्यांच्या तोंडून वदवून घेण्यास अयोग पक्षास अपयश आले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलांनी उलटतपास घेतलेला नाही.

११. अभियोग पक्षाने आरोपींवरील अपराध शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्र.२ ब्रम्हाजी माधवराव केंद्रे यांची साक्ष निशाणी क्र.१०८ वर नोंदवली आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१७ मध्ये त्यांच्या पत्नीने आरोपीं विरुध्द फसवणुकीची केस केली होती व पोलीसांनी त्यांचे टिपण नोंदवले होते. परंतु सदर घटनेला १० वर्षे झाली असल्याने त्यांना त्याबाबत काही आठवत नाही. सदर साक्षीदार अयोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांच्या विनंतीवरून सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची अनुमती अभियोग पक्षास देण्यात आली. त्याप्रमाणे तपशीलवारपणे विचारणा करण्यात आली. परंतु अभियोग पक्षास उपयुक्त अशी साक्ष त्यांच्या तोंडून वदवून घेण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीच्या वकिलांनी उलटतपास घेतलेला नाही.

१२. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी वरील दोन साक्षीदार वगळता दुस-या साक्षीदाराचीसाक्ष नोंदवली नाही. तपासिक अंमलदार, पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. तसेच कागदोपत्री पुरावा शाबीत करण्यात आला नाही. अभियोग पक्षास आरोपीरूद्ध ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे शाबीत करण्यास पूर्णपणे अपयश आले आहे. वरील बाबींचे अवलोकन केले असता आरोपींनी कथित गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे शाबीत केले नाही. आरोपींच्या विधिज्ञाच्या यक्तीवादानुसार

त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली आहे. सदर फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान असलेला वाद मिटलेला आहे. सद्यस्थितीत फिर्यादी व आरोपीमध्ये कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

१३. प्रस्तुत केसमध्ये संयुक्त तडजोड पुरशीस दाखल करण्यात आली आहे. वरील बाबींचा विचार करता आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे संशयापलीकडे शाबीत होत नाही. सबब, प्रश्न क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**प्रश्न क्र. ५ करीताः–**

१४. प्रश्न क्र.१ ते ४ बाबतचे माझे निष्कर्ष पाहता अभियोग पक्षाला आरोपींविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. परिणामतः आरोपींना निंदोष मुक्त करणे योग्य होणार आहे. तसेच, आरोपी कडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीकडून प्रत्येकी रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीतादेण्याचे आदेश करणे योग्य होणार आहे. त्यामुळे याकामी मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ भगीरथ ज्ञानोबा ढेकणे, क्र.२ बीरांची नारायण मिश्रा, क्र.३ अनुप अजयकुमार शाह यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ अन्वये दंडनिय अपराध केल्याच्या आरोपांतून निंदोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रक्कम रूपये २५,०००/– चा प्रत्येकी वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता द्यावयाचा आहे व तो सहा महिन्यांसाठी अस्तित्वात राहील. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by SHIVLEENA JEETENDRA SHINDE
Date: 2026.07.09 16:16:43 +0530

(श्रीमती एस.जे.शिंदे)

दिनांक ९.७.२०२६ २रे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, उदगीर,

जिल्हा लातूर.

**भागः–ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १५/०२/२०१६ ते १४/११/२०१७ |
| प्रथम खबर दिनांक | : | १४/११/२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | १७/१०/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | २२/०७/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | : | २१/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय आरक्षित केल्याचा दिनांक | : | ०९/०७/२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | : | ०९/०७/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | : | –– |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप निश्चित केल्याचे कलम | शिक्षा किंवा दोषमुक्त | शिक्षा | संपरीक्षेदरम्यान आरोपी कोठडीत असल्याचा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भगीरथ ज्ञानोबा ढेकणे | ०७.०९.२०१८ | ०७.०९. २०१८ | भारतीय दंड संहितेचे कलम ४०६, ४०९, ४१७, ४६७ सह कलम ३४ | र्निदोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |
| २ | बीरांची नारायण मिश्रा | ०७.०९.२०१८ | ०७.०९. २०१८ | -"- | र्निदोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |
| ३ | अनुप अजयकुमार शाह | ०७.०९.२०१८ | ०७.०९. २०१८ | -"- | र्निदोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |

## भाग क

## [परिच्छेद ४४ (III) चे प्रकरण ६ फौजदारी नियमावली]

### अ. अभियोग पक्ष

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | अनिता ब्रम्हाजी केंद्रे | वर्दीदार |
| सा.क्र.२ | ब्रम्हाजी माधवराव केंद्रे | वर्दीदाराचा पती |

### ब. बचावाचे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### क. न्यायालयीन साक्षीदार, जर असल्यास

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | अ–१०६/ सा.क्र.१ | फिर्यादीवरील फिर्यादीची सही |
| २ | अ–१०७/ सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवाला वरील फिर्यादीची सही |
| ३ | ११० | फिर्यादीची पुरावा देणे नाही बाबत पुरसिस. |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड. जड वस्तु**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | –– | –– |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHIVLEENA JEETENDRA SHINDE
Date: 2026.07.09 16:16:54 +0530

(श्रीमती एस.जे.शिंदे)

दिनांक ०९.०७.२०२६

२रे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, उदगीर,

जिल्हा लातूर.